पुस्तक परिचय ः

**पुस्तकाचे नांव ः Mom’s Kitchen**
**प्रकाशक ः BMM of North America**
**www.bmmonline.org**
**संकलन ः मोना वासुदेव, समिता रानडे आणि छाया असणके**
**मूल्य ः डॉ.२०.००, पृष्ठसंख्या ः २१८**

ग्रोसरी स्टोअर पासून ते ग्रंथालयापर्यंत सर्व ठिकाणी अनेक पाकक्रियेची पुस्तके दृष्टीस पडतात.काही पुस्तके अगदी सामान्य असतात तर काही आकर्षक असतात. काही पुस्तकांच्या वरच्या वेस्टनावरून आंतील “पाकक्रिया” समजतात. आकर्षक मुखपृष्ठ असलेली आणि त्याजबरोबर आंतील पाककिीया तितक्याच मोलाच्या असलेली पुस्तके फार विरळा. असेच एक बहुगुणी इंग्रजीमधील पुस्तक नुकतेच प्रसिध्द झालं आहे.

आहार, आरोग्य व आचरण ही जीवनाची त्रिसुत्री आहे.पुर्वीच्या पिढीतील सुग्रण सुगृहिणींनी आपल्या चालीरीती, रूढी आचरणांत आणून महाराष्ट्रीय संस्कृती व परंपरेचा वसा सध्याच्या पिढीपर्यंत पोहोचविला. त्या सर्व भगिनींना Mom’s Kitchen  हा संग्रह अर्पण केला आहे हे वैशिष्टय !

‘फास्ट फूड’ जमाना, विभक्त कुटुंब आणि घरांतील वडीलधारी मंडळीच्या अभावी व खासकरून परदेशांत  वास्तव्य असलेल्या युवा पिढीला ‘आईच्याओटयावरून’ विचारपूर्वक संकलीत केलेली, अर्थपूर्ण माहितीचा हा ठेवा आहे.

सणवार- व्रतवैकल्यांसंबधी नैवेद्य, चटणी, कोशिंबीर, भरीत, भाजी, सूप, आमटी, वरण, फराळ, पुलाव, फ्युजन, चपाती, पोळी, पराठा, मांसाहारी पदार्थ, गोड पदार्थ, पक्वान्ने इत्यादी २००हून अधीक पाककृतीची समग्र माहिती, खाद्य पदार्थ ातील घटकांचे मूळ नांव, माप व इंग्रजीतून परिमाण दिल्याने सुलभता वाढली आहे. वर्णनाक्रमे पदार्थांचे परीशिष्ट दिल्याने सुलभता वाढली आहे. पुस्तकाची नोंदणी  ISBN वर असती तर आंतरराष्ट्रीय विक्रीला सुलभ झाले असते.

सुबक मांडणी,  आकर्षक मुखपृष्ठ आणि सर्वांगाने केलेली शानदार सजावट यानी पुस्तक मनांत भरते. सोप्या इंग्रजीमधून पदार्थांचे विवेचन केल्यामुळे पुस्तक वाचनीय झाले आहे.तसेच पुस्तकाची बांधणी spiral असल्यामुळे स्वैपाक करताना, पुस्तक उघडे ठेऊन, विशिष्ट पानावरील पाककृती करणे सोपे जाते.

हे पुस्तक प्रत्येक कुटुंबाने संग्राह्य करण्यासारखे आहे. ही दुसरी सुधारलेली आवृत्ती काढण्यामागचे औचित्य आणि श्रेय, मोना वासुदेव, समिता रानडे आणि

छाया अराणके यांना आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि BMM ने हे पुस्तक प्रकाशीत केल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन !

रमेशचंद्र प्रधान- न्यूजर्सी
e.mail : pradhanramesh @hotmail.com